# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २२८-२२** **दिनांक २९/०७/२०२२**

## सायकल चोरी करणाऱ्या ४ आरोपीतांना अटक करुन २५ सायकल हस्तगत- वसई पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

दिनांक १६/०७/२०२२ ते दिनांक १७/०७/२०२२ रोजीच्या दरम्यान फिर्यादी राहत असलेल्या बिल्डींगच्या खाली ठेवलेली ग्रीन व ब्लॅक रंगाची सायकल कोणीतरी अज्ञात इसमांनी चोरी केले बाबत तक्रार प्राप्त झाल्याने सदर प्रकरणी वसई पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. २३९/२०२२ भा.द.वि.कलम-३७९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वसई पोलीस ठाणे हद्दीत सध्या वाढत असलेल्या सायकल चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेता वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सदर प्रकारच्या गुन्हयांना आळा घालण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने वसई पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन व गोपनीय माहितगाराचे मार्फतीने माहिती काढून दिनांक २७/७/२०२२ रोजी भोयदापाडा वसई पुर्व परिसरात सापळा रचुन आरोपी नामे १) अंश माताप्रसाद जयस्वाल, वय-३६ वर्ष, रा. वालीव वसई पुर्व ता. वसई जि. पालघर मुळगाव- ता. लमुहा, जि. सुलतानपुर, राज्य- उत्तरप्रदेश, २) मखन्छू रामगोपाल कनोजिया, वय-३० वर्ष, वालीव वसई पुर्व, ता. वसई जि. पालघर मुळगाव- ता. लमुहा, जि. सुलतानपुर, राज्य- उत्तरप्रदेश, ३) विजयकुमार घनशाम गुप्ता, वय- ३३ वर्ष, वसई पुर्व, ता. वसई जि. पालघर ४) महेद्र खिनीलाल सरोज, वय- ३७ वर्ष, रा. बोईदापाडा, वसई पु, ता. वसई जि. पालघर यांना ताब्यात घेवुन अटक करुन सदर आरोपीतांकडे सखोल तपास करुन त्यांच्याकडुन एकुण ८९,४००/- रुपये किमंतीच्या एकूण २५ सायकल हस्तगत करुन वसई पोलीस ठाण्यामध्ये दाखल एकूण ०७ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२ वसई, श्री. प्रदिप गिरीधर, सहा.पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. कल्याणराव कर्पे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वसई पोलीस ठाणे, श्री. ऋषिकेश पवळ, पोलीस निरिक्षक (गुन्हे), सपोनि/राम सुरवसे, सपोनि/सुनिल पवार, पोउनिरी/विष्णू वाघमोडे, पोहवा./१२९५ सुनिल मलावकर, पो.कॉ/१८०० अमोल पाटील, पो.कॉ/१४०१७ सुर्यकांत मुंढे, पो.कॉ/१००६५ राजेंद्र जाधव, पो.कॉ/शरद पाटील,पो.कॉ./अक्षय नांदगावकर यांनी केलेली आहे.


मिरा - भाईंदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालय
वसई पोलीस ठाणे
दुरध्वनी - ०२५० - २३२२१८८ (कार्यालय)